## अंतरीम खावटी अर्ज नि.क्र.११ वरील आदेश
## (पारीत दि.१८.११.२०२१)

१. अर्जदार शैला प्रकाश क्षिरसागर हिने स्वत: करीता व अर्जदार क्र.२ व ३ करीता कलम १२ अन्वये अर्ज केला आहे व त्यामध्ये सदरचा कलम २३ प्रमाणे अंतरिम खावटी मिळण्याकरीता प्रार्थना केली आहे.

**अर्जदाराचे कथन खालीलप्रमाणे** :–

२. अर्जदार क्र.१ हिचा विवाह गैरअर्जदार क्र.१ सोबत त्यांच्या धर्मातील रितीरिवाजाप्रमाणे दि.१५.०४.२००९ रोजी संपन्न झाला. त्यानंतर ती मौजा कु–हा येथे गैरअर्जदार क्र.१ च्या घरी एकत्र कुटुंबात नांदावयास गेली. या विवाहसंबंधांतुन अर्जदार हीला दोन मुले नामे आदित्य व क्रीष्णा असे जन्मास आले असुन ते सध्या अर्जदारासोबत राहत आहेत व त्यांचे पालनपोषण व शिक्षण अर्जदार हीच करीत आहे. गै.अ.क्र.२ व ३ हे तिचे सासु सासरे असुन गै.अ.क्र.४ व ५ नणंद व नंदोई आहेत. तसेच गै.अ.क्र.६ व ७ हे सुध्दा नणंद व नंदोई आहेत. या सर्वांनी अर्जदाराचा क्रुरपणे छळ केला, मारहाण केली, तिला मानसिक त्रास दिला, तिच्या पतीला ईतर गैरअर्जदारांनी भडकावुन दिले. त्यामुळे गै.अ.क्र.१ ने तिला बेदम मारहाण केली व दोन्ही मुलांसह घराबाहेर काढुन दिले. या कामी सर्व गैरअर्जदारांनी त्याला मदत केली व त्यांनी सुध्दा अर्जदार हीला मारहाण केली. लग्नानंतर सर्व गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेउन भांडण केले. गै.अ.क्र.१ हा दारू पिउन पडुन राहत होता. अनेक वेळा गावातील लोकांनी त्याला घरापर्यंत पोहोचवुन दिले. अशाही परिस्थितीत अर्जदार तिचा संसार निटनेटका करण्याचा प्रयत्न करीत होती. दि.११.१२.२०२० रोजी सर्व गैरअर्जदारांनी अर्जदार हीला बेदम मारहाण केली व कडाक्याचे भांडण केले. यामुळे अर्जदाराचा मुलगा आदित्य याने अर्जदाराच्या वडिलांना बाभुळगांव येथे फोन केला व ताबडतोब कु–हा येथे बोलाविले. त्यामुळे अर्जदाराला तिचे वडिले मुलांसह बाभुळगांव येथे माहेरी घेउन आले व आज रोजी ती बाभुळगांव येथे राहत आहे. सदर घटनेचा रिपोर्ट तिने दि.१३.०३.२०२१ रोजी बाभुळगांव पोलीस स्टेशनला दिला. त्यावरून अपराध क्र.१०३/२०२१ कलम ४९८अ सहकलम ३४ भा.द.वि. अंतर्गत प्रकरण दाखल असुन न्यायप्रविष्ट आहे. वरील सर्व गैरअर्जदारांनी अर्जदाराचा क्रुरपणे शारीरीक व मानसिक छळ केला आहे.

३. गै.अ.क्र.१ कडे ६ एकर ओलीताची सुपिक शेतजमीन आहे. तसेच कु—हा येथे ६ रूमचे स्लॅबचे घर असुन त्याची किंमत आज रोजी रू. ३०,००,०००/— आहे. तसेच गै.अ.क्र.१ हा रोजमजुरी सुध्दा करतो. त्यामुळे सर्व मालमत्तेतुन गै.अ.क्र.१ हा दरमहा रू.२०,०००/— कमवितो. याउलट अर्जदार ही तिच्या दोन्ही मुलांचे पालनपोषण व शिक्षण करीत असुन तिला उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदारांनी तिला कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. सदर प्रकरणामध्ये दोन्ही बाजुंचे पुरावे, युक्तीवाद व न्यायनिर्णय याकरीता बराच अवधी लागु शकतो. अर्जदाराला तिच्या मुलांना शाळेमध्ये प्रवेश द्यावयाचा आहे. तसेच आजची महागाईची परिस्थिती लक्षात घेता अर्जदाराला तिच्या उदननिर्वाहाकरीता अंतरीम खावटी मिळण्याबाबत विनंती केली आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हीला दरमहा रू.७०००/— व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रू.३०००/— अंतरीम खावटी गै.अ.क्र.१ कडुन मिळण्याबाबत विनंती केली आहे.

४. सदर प्रकरणात नोटीस मिळुन गैरअर्जदार प्रकरणात हजर झाले व गै. अ.क्र.१ ने नि.क्र.१२ प्रमाणे सदर अंतरीम खावटीच्या अर्जास त्याचे उत्तर दाखल केले व त्याद्वारे कथन केले की, गैरअर्जदारांविरूध्द किरकोळ फौ.अर्ज क्र.०९/२०२१ हा अर्ज न्यायालयात प्रलंबित नाही. त्याच्याविरूध्द ०८/२०२१ हा अर्ज न्यायालयात प्रलंबित आहे. अर्जदाराने गैरअर्जदारांविरूध्द घरगुती हिंसाचाराची केस दाखल केली आहे त्याबाबत वाद नाही. गैरअर्जदार हा सदर केसमध्ये दि.२८.०६.२०२१ रोजी हजर झाला व त्याने सदर अर्जामध्ये अर्जदार हीस नांदविण्याचा प्रस्ताव दाखल केलेला आहे. परंतु अर्जदाराने त्याला आजपर्यंत उत्तर दिले नाही. त्यामुळे अर्जदार हीला गैरअर्जदारासोबत नांदावयास जावयाचे आहे किंवा नाही याबाबत कोणताही खुलासा झालेला नाही. सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार याने त्यांचा लेखी जबाब दि.०९.०८.२०२१ रोजी सविस्तरपणे दाखल केला आहे. परंतु असे असतानाही अर्जदाराने दि. ०८.०९.२०२१ रोजी अर्जदाराचा पुरावा दाखल न करता अंतरीम खावटीचा अर्ज दाखल केला आहे. यावरून असे निदर्शनास येते की, अर्जदार हीला सदर केस चालविण्याची कोणतीही घाई नाही. फक्त गैरअर्जदारांना मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार ही स्वत:हुन अर्ज चालविण्यास टाळाटाळ करीत आहे. अर्जदाराने न्यायालयीन प्रक्रियेत अडथळा आणण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज शपथपत्रानुसार दाखल

केलेला नसल्यामुळे अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात यावा. गैरअर्जदाराची अंतरीम खावटी देण्याची कुठलीही परिस्थिती नसल्यामुळे गैरअर्जदार हा अंतरीम खावटी देण्यास असमर्थ आहे. तो अर्जदार हीला आजही नांदविण्यास तयार आहे.

५. अर्जदार, गैरअर्जदार व त्यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) अर्जदार ही तिने स्वत:करीता व तिच्या मुलांकरीता केलेल्या अंतरिम पोटगीच्या मागणीस पात्र आहे काय ? | .... | अंशत: होकारार्थी. |
| २) आदेश काय ? | .... | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## —:: कारणमिमांसा ::—

६. अंतरिम पोटगीच्या अर्जासोबत अर्जदाराने लग्नपत्रिका, अर्जदार क्र.१ ते ३ चे आधार कार्ड, अर्जदार हीने दि.१३.०३.२०२१ रोजी पो.स्टे. बाभुळगांव येथे दिलेल्या रिपोर्टची प्रत, ई. कागदपत्र दाखल केले आहेत. याउलट गैरअर्जदाराने त्याच्या बचावाकरीता कोणतेही कागदोपत्री पुरावे दाखल केलेले नाहीत.

### मुद्दा क्र.१ करीता :—

७. अर्जदार क्र.१ व गैअर्जदार क्र.१ यांचा विवाह रितीरिवाजाप्रमाणे झाला ही बाब दोन्ही पक्षांना मान्य आहे. अर्जदार व तिच्या वकिलांनी केलेल्या कथनावरून प्रथमदर्शी असे दिसून येते की, दोन्ही पक्षांनी एकमेकांवर केलेले आरोप हे पुराव्यावर सिध्द होणे बाकी आहे. परंतु अर्जदार हिचा कौटुंबिक छळ करण्यात आला आहे व सदर छळामुळेच तिने सदर अर्ज दाखल केला आहे व गैरअर्जदारांनी दाखल केलेल्या उत्तरावरून सध्य परिस्थीतीत अर्जदार हिचे कथन अमान्य करण्यास पुरेसे कारण नाही. याउलट गैरअर्जदाराचा नांदविण्याचा प्रस्ताव असुनही त्याबाबत अर्जदाराने कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिचा कौटुंबिक छळ करण्यात आला असे प्रथमदर्शनी दिसते.

८. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, गै.अ.क्र.१ कडे ६ एकर ओलीताची सुपिक शेतजमीन आहे. तसेच कु—हा येथे ६ रूमचे स्लॅबचे घर असुन

त्याची किंमत आज रोजी रू.३०,००,०००/— आहे. तसेच गै.अ.क्र.१ हा रोजमजुरी सुध्दा करतो. त्यामुळे सर्व मालमत्तेतुन गै.अ.क्र.१ हा दरमहा रू.२०,०००/— कमवितो. अर्जदार हिने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून व गैरअर्जदाराच्या कथनावरून गैरअर्जदार हा मजुरी करतो हे प्रथमदर्शनी दिसते. तसेच त्याच्याकडे शेती असुन त्यातुन देखील त्याला उत्पन्न मिळते याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रकरणात दाखल नाही. त्यामुळे गैरअर्जदार हा कमावण्यास सक्षम असुन त्याच्यावर अर्जदारांव्यतिरिक्त कुणीही अवलंबुन नसल्याचे गृहीत धरण्यास पुरेसे कारण आहे. सद्य परिस्थितीत गैरअर्जदार हा जास्तीत जास्त काम करून रू.३००/— ते ४००/— रोज सहज कमवु शकतो. अर्जदार ही माहेरी राहत असताना गैरअर्जदाराने तिला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत केली असे कुठेही दिसुन येत नाही. सद्य परिस्थितीत अर्जदार क्र.२ व ३ हे अर्जदारासोबत राहत असल्याची बाब दोन्ही पक्षांना मान्य आहे. अर्जदार क्र.२ व ३ यांचे वय पाहता त्यांची शैक्षणिक गरज भागवणे हे अत्यंत आवश्यक आहे. अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची व पालणपोषणाची संपुर्ण जबाबदारी पती व पिता या नात्याने गैरअर्जदार क्र.१ ची आहे. अशा परिस्थितीत गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारांना पालनपोषण व उदरनिर्वाहाकरीता रूपये ३०००/— (रूपये तीन हजार फक्त) प्रतिमहा अंतरिमरित्या सहज देवू शकतो व ती त्याची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्र.१ चे उत्तर मी अंशत: होकारार्थी नोंदवीत आहे. वरील चर्चेच्या विचाराअंती मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरा दाखल खालिलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## —:: **आदेश** ::—

१) अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ते ३ यांना अंतरीम खावटी म्हणुन दरमहा रूपये ३०००/— (रूपये तीन हजार फक्त) प्रस्तूत अर्ज अर्जदाराने दाखल केलेल्या तारखेपासून म्हणजे दिनांक २८.०५.२०२१ पासुन ते प्रस्तूत प्रकरण निकाली निघेपर्यन्त दयावे.

३) आदेशाची एक प्रत अर्जदार व गैर अर्जदार यांना माहितीस्तव विनामुल्य द्यावी.

(खुल्या न्यायालयात घोषित)

स्वा/—

दिनाक १८.११.२०२१

**(कु.जयश्री मा.काकडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
बाभुळगांव.